पुणे, दिनांक ०७/०८/२०१९

## प्रेस नोट

दिनांक ०७/०८/२०१९ रोजी दुपारी १२.०० वाजता **मा. डॉ. के. व्यंकटेशम् पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे अध्यक्षतेखाली** पोलीस आयुक्त कार्यालयातील कॉप्स् एक्सलन्स हॉल येथे पुणे शहरातील निरनिराळ्या क्लबचे सभासद पदाधिकारी यांचेमध्ये **'संवाद'** कार्यक्रम संपन्न झाला आहे.

सदर कार्यक्रमास **१. पूना क्लब २. रोटरी क्लब ३. लॉयन्स क्लब ४. पी.वाय.सी. क्लब ५.डेक्कन क्लब ६. कोरीयंथन क्लब ७. रेसीडेन्सी क्लब ८. द लेडीज क्लब ९. रॉयल कॅनॉट क्लब १०. राऊंड टेबल क्लब ११. टर्फ क्लब १२. आर्ट ऑफ लिव्हींग क्लब १३. बोट क्लब १४. द न्यू क्लब** या सारख्या नामवंत क्लबचे एकुण १०० पेक्षा जास्त मान्यवर अध्यक्ष, व्यवस्थापक, सभासद उपस्थित होते.

कार्यक्रमामध्ये पोलीस आयुक्तालयातर्फे राबविण्यात येणारे सेवा प्रोजेक्ट, क्रिप्स, भरोसा, ट्रॅफिक क्लब, सी वॉच, आभार स्कीम, पोलीस केअर, रक्षा ॲप, बडी कॉप, वाहतुक शाखेकडून राबविण्यात येणारे वाहतुक समस्या निवारण प्रोजेक्ट इत्यादि संदर्भात सादरीकरण करुन माहिती देण्यात आली. तसेच सदर उपक्रमांमुळे काही सदराखालील गुन्हयांमध्ये घट झालेचे नमुद करण्यात आले. त्यानंतर क्लबतर्फे उपस्थित मान्यवर अध्यक्ष, सभासद पदाधिकारी यांचेत विचारांची देवाण घेवाण झाली. मान्यवरांनी दिलेल्या सुचना व प्रश्नोत्तर सत्राद्वारे **सुसंवाद** साधण्यात आला.

कार्यक्रमांचे सुत्र संचालन डॉ. शिवाजी पवार, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा यांनी केले. पोलीस आयुक्तालयामार्फत राबविण्यात येणारे निरनिराळ्या उपक्रमांचे सादरीकरण श्री. बच्चन सिंह, पोलीस उपआयुक्त, गुन्हे यांनी केले. सदर कार्यक्रमास श्री. रविंद्र शिसवे, पोलीस सह-आयुक्त,पुणे शहर, श्री. अशोक मोराळे, अपर पोलीस आयुक्त,गुन्हे व श्री. संभाजी कदम, पोलीस उपआयुक्त,आर्थिक व सायबर गुन्हे,पुणे शहर असे वरीष्ठ अधिकारी उपस्थित होते.


COPS EXCELLENCE
COPS EXCELLENCE
(CENTER OF POLICE SERVICE EXCELLENCE)
Healthy Strong Capable ... a transformative laboratory
पुणे पोलीस



